भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक १२.०६.२०१९ ते १६.०६.२०१९)

| अंक ४७/२०१९ | दिनांक ११.०६.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०५/०६/२०१९ ते ११/०६/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १२/०६/२०१९ ते १६/०६/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५/०६ | ०६/०६ | ०७/०६ | ०८/०६ | ०९/०६ | १०/०६ | ११/०६ | दिनांक | | १२/०६ | १३/०६ | १४/०६ | १५/०६ | १६/०६ |
| ०.० | २१.२ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | १.० | पाऊस (मि. मी) | | ४० | २३ | ४५ | ३३ | ५६ |
| ३७.५ | ३२.५ | ३६.० | ३६.० | ३६.० | ३७.० | ३७.० | कमाल तापमान (अं. से) | | ३६ | ३५ | ३५ | ३४ | ३४ |
| २४.० | २२.५ | २५.५ | २४.० | २४.० | २४.० | २५.० | किमान तापमान (अं. से) | | २५ | २६ | २७ | २६ | २६ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ८ | ८ | ७ | ६ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार | | | | | | |
| ८५ | ९३ | ९२ | ८४ | ९२ | ८५ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८६ | ८९ | ८९ | ८८ | ८९ |
| ४८ | ६६ | ५७ | ५५ | ५७ | ५७ | ८५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ५५ | ७९ | ७४ | ६९ | ६६ |
| ०.० | ०.९ | ०.४ | ०.५ | ०.४ | ०.५ | १.८ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ०२९ | ०१६ | ०१० | ००९ | ०१३ |
| स्थिर | दक्षिणे | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | नैऋत्ये | सकाळ | वा-याची दिशा | दक्षिणे कडून | दक्षिणे कडून | दक्षिणे कडून | दक्षिणे कडून | नैऋत्ये कडून |
| दक्षिणे | पुर्वे | पुर्वे | पुर्वे | दक्षिणे | पश्चिमे | नैऋत्ये | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ०.० | २२.२ | २२.२ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्हयात मुसळधार स्वरुपाचा पाऊस पडण्याची व वा-याचा वेग वाढण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, नागली | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | या आठवड्यात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याने खरिप पीकांच्या पेरणीस सुरुवात करावी. भातासाठी रोपवाटिका तयार करावयाच्या क्षेत्रामध्ये प्रती गुंठा १ किलो युरिया, ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट व चांगले कुजलेले शेणखत द्यावे. बियाण्यास प्रती २ ग्रम याप्रमाणे थायरम किंवा इमिसान हे औषध चोळावे. वाफ्यावर पेरणी करताना ७ ते ८ सेमी अंतरावर ओळीमध्ये साधारण २ सेमी खोलीवर बी पेरावे आणि ते झाकुन घ्यावे. जाड दाण्याच्या जातीकरीता ४० किलो तर संकरीत जातीकरीता २० किलो बियाणे वापरावे. नागली आणि वरी पीकांची पेरणी देखील भाताप्रमाणे करावी व बियाणे विरळ पेरावे त्यामुळे रोपे जोमदार होतील.<br>भात रोपवाटीकेतील तणांच्या नियंत्रणाकरीता पेरणीनंतर वाफे ओले होताच ताबड्तोब किंवा ५ ते ६ दिवसांपर्यंत परंतु तणे उगविण्यापुर्वी ब्युटॅक्लोर ५% क्रियाशिल घटक (मॅचेट) हे तणनाशक ६० मिलि प्रती १० लि. पाणी या प्रमाणात मिसळुन फवारणी करावी. फवारणी करताना पाठीवरच्या नॅपसॅक पंपाने मागे सरत फवारणी करावी.<br>ज्या ठिकाणी गादि वाफे करणे शक्य नसेल तर रोपे तयार करण्यासाठी शेतातील उंचवठ्याची जागा निवडावी. व चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल.<br>भात रोपवाटीकेमध्ये पाणी मोठ्या प्रमाणात साचुन राहिल्यास अतिरीक्त पाण्याचा निचरा करावी.<br>रोपवाटीकेचे खेकड्यांपासुन संरक्षण करावे. त्यासाठी १ किलो शिजवलेल्या भातामध्ये ७५% पा.मि. ऍसिफेट पावडर ७५ ग्रॅम किंवा पा.मि. कार्बारील भुकटी १०० ग्रॅम टाकुन विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करुन बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ ओल्या मातीने बुजवावे. दुस-या दिवशी जि बीळे उकरली जातील अशा ठिकाणी परत अमिष वापरावे. |
| भुईमुग | पुर्व मशागत व पेरणी | जमिन मध्यम ते भारी आणि चांगला निचरा होणारी निवडावी. जमिन खोल नांगरुन भुसभुशित करावी. शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट मातीत मिसळुन घ्यावे.<br>खरीप हंगामातील भुईमुगाची पेरणी १० ते २० जुन पर्यंत करावी. या आठवड्यात हलका पाऊस पडण्याची शक्यता असल्याने भुईमुगाच्या पेरणीची पुर्व तयारी करावी.<br>पावसाचा अंदाज घेवुन भुईमुग लागवडीसाठी शेताच्या पुर्वतयारीची कामे हाती घ्यावीत. त्यासाठी जमिन खोल नांगरुन भुसभुशीत करावी व शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टरी १० टन चांगले शेणखत किंवा कंपोस्ट मिसळावे. डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोकण गौरव व ट्रॉम्बे कोकण (टपोरा) तसेच टी.जी.२६, टी.ए.जी. २४, टी.पी.जी. ४१ या जातींची निवड करावी. प्रती हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी थायरम ३ ग्रॅम/किलो या प्रमाणात चोळावे. |
| काजु | नवीन लागवड | काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| भाजीपाला | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | भाजीपाला पीकांमध्ये मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, काकडी, कारली, पडवळ, चिबुड, शिराळी ई. पीकांची लागवड करण्यास योग्य हवामान असुन पाऊसाचा अंदाज पाहुन पेरणी करावी. तसेच पेरणीसाठी सुधारीत जातीचे बियाणे वापरावे. भेंडीची लागवड सरी-वरंब्यावर करावी. वेलवर्गीय भाजीपाला पीकांसाठी मातीचे ऊंचवटे करुन त्यावर मध्यभागी लागवड करावी. |
| सागरी मासेमारी | - | वायु चक्रिवादळ अरबी समुद्रात घोंगावत असुन ते गुजरातच्या दिशेने सरकत आहे, त्यामुळे पश्चिम किनारपट्टीवर विजांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण, पुर्व व मध्य अरबी समुद्राची जास्त खवळलेली स्थिती असल्यामुळे समुद्रात मासेमारी करण्यास न जाण्याचा सल्ला भारतील हवामान शास्त्र विभागाकडुन मच्छीमारांना देण्यात येत आहे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी संशोधन संचालक/नोडल ओफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>प्रा.फ.सं.के. वेंगुर्ले, जि. सिंधुदर्ग<br>(०२३६६-२६२२३४, २६२६९३) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|